**<u>फौ.कि.अर्ज क्र. ३७२/२०१७</u>**

**<u>नि.१२ वर सुरू</u>**

**<u>अर्जदाराचा उलटतपास जाबदेणारतर्फे वकिल श्री.एन.जी.शहा यांच्यामार्फत शपथेवर सुरू:—</u>**

मी सध्या बावडा येथे माझे मामाकडे राहते. माझे आई वडिल आलेगाव, ता. माढा येथे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, माझे आई वडिलांचे गाव आले गाव येथे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी बावडा येथे मामाकडे रहाते याबाबत मी बावडा येथील तलाठयाचा रहिवासी दाखल दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मामाच्या नावे असणा—या रेशनकार्डास माझे नावाची नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी बावडा येथे मामाकडे राहते हे दाखविण्यासाठी माझकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, रामचंद्र पाटील हे माझे वडिल आप्पाराव व अमोल रामचंद्र पाटील हे माझे भाउ व सुवर्णा ही माझी आई आहे. माझे शिक्षण इयत्ता १२वी झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिलांची आर्थिक परिस्थीती गरीबीची आहे त्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा मी याकामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिलांच्या, भावाच्या तसेच आईच्या नावे आलेगाव येथे जमिनी आहेत. त्याचे ७/१२ उतारे व ८अ चे उतारे याकामी **<u>नि.८३ ते नि.९१</u>** अन्वये दाखल केलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई भाउ, वडिल व माझा स्वत:चा आलेगाव येथील तलाठी यांच्याशी कोणताही वाकूडपणा नाही. हे म्हणणे खरे आहे की, **<u>नि.८३ ते नि.९१</u>** अन्वये दाखल केलेल्या उता—यांवर उस या पिकाची नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, तो उस निरा भिमा साखर कारखान्यास गेलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिल, आई व माझे भाउ यांची मतदानाची नोंद आलेगाव येथे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मनिषा ब्युटीपार्लर या नावाने माझे ब्युटीपार्लर आहे. हे म्हणणे खरे आहे की माझे आई, वडिल, भाउ हे एकात्रात आलेगाव येथे रहातात. हे म्हणणे खरे नाही की, मी जाबदेणारसोबतच्या वैवाहीक वादानंतर आलेगाव येथे राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी गेली आठ वर्षापासून बावडा येथे राहत आहे हे मी खोटे नमूद केले आहे.

०२. हे म्हणणे खरे आहे की, माझे मुळ अर्जातील जाबदेणार क्र.४, ६ व ८ या माझे विवाहीत नणंदा आहेत. हे म्हणणे खरे आहे की, जाबदेणार क्र.५, ७ व ९ हे माझे विवाहीत नंणंदाचे पती आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझा नणंदा व नंदवा यांची पत्ते बाभळ गाव सोडून वेगळे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, नंणंदा व नंदवा याचे बाभुळगाव येथे रेशनकार्ड नाही व जमिनी नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, माझा नणंद व नंदवा हे बाभुळगाव येथे एकत्रात राहातात याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही.

०३. हे म्हणणे खरे आहे की, माझे व जाबदेणार क्र.१ च्या लग्नामध्ये माझे आई वडिलांना खर्च केला त्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी याकामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे लग्न हे जाबदेणार याने त्याच्या खर्चाने केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे व जाबदेणार क्र. १ चे लग्न हे एकमेकांच्या पसंतीने, पाहुण्यांच्या बैठकीने ठरलेले होते.हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र.४ मधील छळासंबंधीचा जो मजकूर आहे त्याबाबत मी पोलीसात तक्रार दिलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबतची स्थळपत्र अथवा इतर कागदोपत्री पुरावा मी याकामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी महिला तक्रार निवारण केंद्रात तक्रार दिली होती याचादेखील कागदोपत्री पुरावा मी याकामी दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे पतीने मला ॲड. जगताप यांच्यामार्फत दि.११/०२/२०१७ रोजी नोटीस पाठविली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या नोटीसीस उत्तर दिलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, उत्तरी नोटीस याकामी दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी उत्तरी नोटीस पाठविली नसल्याने ती याकामी दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे पतीने मला दि.११/०२/२०१७ ची नोटीस माझे माहेरच्या पत्यावर पाठविली होती. माझे सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र ५ मधील दि.२५/०५/२०१७ च्या कथीत प्रकाराबाबत मी पोलीसात तक्रार दिली होती किंवा नाही हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वर नमूद प्रकाराबाबत पोलीसात तक्रार दिल्याचा कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी दाखल नाही. मी दि.२६/०७/२०१७च्या कथीत प्रकाराबाबत तक्रार दिली किंवा नाही हे मला आठवत नाही.

प्रश्नः—दि.२६/०७/२०१७ पासून तुम्ही तुमच्या माहेरी राहत आहात?

उत्तरः—दि.२६/०७/२०१७ पासून मी माझे मामाकडे रहात आहे.

हे म्हणणे खरे आहे की माझे अर्जामध्ये मी दि.२६/०७/२०१७ नंतर माहेरी व त्यांनतर मामाकडे रहात आहे असे नमूद आहे.

०४. हे म्हणणे खरे आहे की जाबदेणार यास दुधापासून २० ते २५ हजार रूपये उत्पन्न मिळते हे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा मी याकामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, जाबदेणार याच्याकडे टॅक्टर आहे व त्यापासून त्यास उत्पन्न मिळते याबाबचा कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, जाबदेणार याच्याकडे स्कार्पीओ तसेच मोटार सायकली आहेत याबाबचा कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेल्या यादी **नि.१४** सोबत **नि.५९ ते नि.६४** मध्ये जाबदेणार क्र.४ ते ९ यांच्या नावाची नोंदी नाहीत. हे म्हणणे खरे आहे की त्या उता—यावर जाबदेणार क्र.१ व्यतिरीक्त इतर धारकांच्या नोंदी आहेत. माझे नणंदा सविता, सुवर्णा, चांदणा, सुरेखा यांनी जाबदेणार क्र.

१ ते ३ यांचविरूध्द रे.दि.मु.नं.४४/२०१७ चा दावा वाटपासाठी दाखल केला आहे याबाबत मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे ७/१२ उतार—यावरील माझे पतीच्या तसेच जाबदेणार क्र.१ ते ३ यांच्याच फक्त मालकीच्या नाहीत.

०५. हे म्हणणे खरे नाही की, इयत्ता १२ वी नंतर चांगले शिक्षण घेवून स्वतःचे करिअर करायचे ही माझी इच्छा होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझे पतीदेखील नोकरदार असावेत ही माझी इच्छा होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती व दिर हे शेतमजूर असल्याने माझे मनामध्ये नाराजी होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीकडे नांदत असताना मी वेगळे झोपत असे तसेच माझे पतीस शरीरसंबंध ठेवू देत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे लग्नापासून माझे व माझे पतीचे कधीही शरिरसंबंध आलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, लग्नानंतर माझेकडे मोबाईल फोन होता साक्षीदार स्वतःहून सांगते की, परंतू तो लगेच काढून घेतला. हे म्हणणे खरे नाही की, लग्नानंतर रक्षाबंधनासाठी माहेरी गेल्यानंतर मी तेथे चार ते पाच महिने राहिले व त्यांनतर माझे पती मला घेवून जाण्यासाठी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१७ नंतर माझे व माझे पतीमध्ये तडजोड होवून तसे कागदपत्र तयार झाले होते. हे म्हणणे खरे नाही की मला लग्नानंतर बी—एड करायचे होते त्यामुळे मी जाबदेणार क्र.१ यास म्हणत असे की आपण फारकत घेवू. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतः लेडीज टेलर असून ब्युटीपार्लरचा व्यवसाय करतो त्यामुळे मला त्यापासून उत्पन्न मिळते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे वडिलांच्या तसेच भावाच्या व आईच्या शेतीमध्ये मेहनत मशागत करून उत्पन्न मिळविते. हे म्हणणे खरे आहे की, जाबदेणार याने अकरा तोळे सोने काढून घेतले याबाबतच्या कोणत्याही पावत्या मी याकामी दाखल केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की बावडा व आलेगाव ही छोटी गावे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझा मानसिक व शारीरीक हिंसाचार झालेबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा अर्ज दाखल करण्यापुर्वी मी पंचायत समिती गट विकास अधिकारी यांच्याकडे तक्रार दिलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मला स्वतःला जाबदेणार क्र.१ सोबत नांदायची इच्छा नव्हती व त्याच्याकडून आर्थिक लाभ व्हावा म्हणून मी सदरचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वत बारामती कोर्टात मला नांदण्यास न्यावे याबाबतचा अर्ज केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, लग्नानंतर मी स्वतः जाबदेणार यास सोडून माझे माहेरी राहत आहे. सन २०१४ साली जाबदेणार क्र.१ याचा मोटार अपघात होवून हात मोडलेला होता तसेच त्याच्या मणक्याला लागून अपंगत्व आले आहे याबाबात मला माहिती नाही. माझे पतीस गुळवे हॉस्पीटल अकलूज येथे ॲडमिट केले होते त्याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी सासू वयस्कर असून त्यांना रक्तदाबाचा विकार आहे. हे म्हणणे खरे

नाही की, मी टेलरिंगमधून व पार्लरच्या व्यवसायातून उत्पन्न मिळवून स्वत:चा चरितार्थ चालवित आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला कायदयाने पोटगीची गरज नाही व केवळ जाबदेणार यास त्रास देण्यासाठी मी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की जाबदेणार क्र.१ यास उसापासून १० ते १५ लाखांचे उत्पन्न मिळते हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदरचा खोटा अर्ज दाखल केला असून खोटे शपथपत्र दाखल केले आहे व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी पुर्ण.**

**फेरतपास— नाही.**

श्रवणोत्तर स्विकत,

इंदापूर.
दि.११/०१/२०२४.

(**श्रीमती. एस. एस. साळुंखे**)
३रे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, ता.इंदापूर,
जि. पुणे.